# सेलेस्ट को—ऑप. हौसिंग सोसा. (नियोजित)

पत्रव्यवहाराचा पत्ता: ४०१—४०२, ४ था मजला, विराज टॉवर, वेह मेट्रो स्टेशन जवळ, वेस्टर्न एक्सप्रेस हाईवे, अंधेरी (पु.), मुंबई—४०० ०९३.

प्रति,

दिनांक :— १२/०९/२०१८

**उपनिबंधक**
सहकारी संस्था, ठाणे तालुका यांचे कार्यालय
राष्ट्रसंत आचार्य श्री. पद्मसागर सूरीश्वरजी (भवन)
एम.बी.एम.सी. बिल्डींग, शांती गार्डन, रामनगर, मिरारोड (पूर्व)

**विषय :— संस्था नोंदणी प्रस्तावास मुदतवाढ मिळणेबाबत.**

**संदर्भ :— १) आपलेकडील पत्र जा.क्र उपनि/ठाणे ता/बी—८/हौ./नां.रा.ठे./१२३/सन २०१८ दिनांक १७/०४/२०१८ रोजीचे पत्र.**
**२) आमचे पत्र दिनांक १३/०७/२०१८**

**मा. महोदय,**

उपरोक्त संदर्भान्वये आपले पत्र आम्हास प्राप्त झाले असून त्यास उत्तरादाखल खालील प्रमाणे आपणास कळविण्यात येत आहे.

आपल्या संदर्भिय पत्रानुसार सेलेस्ट को—ऑप. हौसिंग सोसा. (नियोजित) या संस्थेकरीता दि. ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक लि. शाखा मिरा रोड (पूर्व), तालुका, जिल्हा — ठाणे या बॅकेत खाते उघडण्यासाठी संदर्भिय पत्रात नमूद केलेल्या अटींवर परवानगी देण्यात आलेली आहे. सदंर्भिय पत्रातील अट क्रमांक २ नुसार राखून ठेवलेले नाव ३ महिन्या पर्यंत राहिल व नोंदणी प्रकरण ३ महिन्याच्या आत न आल्यास नियोजित संस्थेचे नाव रद्द समजण्यात येईल अश्याप्रकारची अट घालण्यात आली आहे.

या पत्राद्वारे आपणास असे नमूद करु इच्छितो की महाराष्ट्र सहकार अधिनियम कायदयातील तरतूदीनुसार ५१% गाळेधारकांनी नोंदणी प्रस्तावावर स्वाक्ष—या करणे बंधनकारक आहे असे समजून येते. तसेच नव्याने आमलात आणलेला RERA कायदयानुसार मुख्य प्रवर्तकांनी ५१% बुकींग केल्यास नोंदणी प्रस्ताव आपल्या कार्यालयात सादर करणे बंधनकारक आहे असे कळून येते परंतू आमच्या नियोजित संस्थेचे नाव आरक्षित झाल्यापासून आज मितीस सदर नियोजित संस्थेतील सदस्यांना कळवून देखील सदस्यांनी नोंदणी प्रस्तावावर अदयाप स्वाक्ष—या केलेल्या नाही. जेणेकरुन नियोजित संस्थेचा नोंदणी प्रस्ताव आपण दिलेल्या मुदतीत आम्ही सादर करु शकत नाही.

तरी या पत्राद्वारे आपलया कार्यालयास अशी विनंती करण्यात येते की संदर्भिय पत्राास अनुसरुन संस्थेच्या नोंदणी प्रस्ताव दाखल करण्याकरीता पुढील २ महिन्याची आणखी मुदत वाढ देण्यात यावी.

धन्यवाद.

लिपीक,
उपनिबंधक
सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठा.
१२/०९/१८

आपला विश्वासू,
**सेलेस्ट को—ऑप. हौसिंग सोसा. (नियोजित)**

मुख्य प्रवर्तक